प्रत मान्यता

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्राशा/स्वयंअशाळा/५५१/2021
पुणे 1 दिनांक - 10/5/2021

प्रति,

**अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,**
डॉ शिवाजीराव कदम नॉलेज ॲकेडमी, ससाणेनगर , हडपसर, पुणे संचलित युनिव्हर्सल पब्लिक स्कुल ससाणेनगर हडपसर, पुणे

विषय :- सन 2015-16 या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- 1. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. 1,6 व 24 ) 2013
2. शासन निर्णय क्र. एसएफएस-1019 / प्र.क्र.1261/एसएम-2, दिनांक 20/09/2019
3. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे जा.क्र.शिउसं/प्राथ 202/स्वयंअशाळा/मान्यता /पुवि/19-20/227, दिनांक 9/01/2020

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. 2 च्या निर्णयानुसार खालील अटी व शर्तीवर विद्यमान शाळा प्राथमिक इ.1ली ते इ.5 वी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | डॉ शिवाजीराव कदम नॉलेज ॲकेडमी, ससाणेनगर , हडपसर, पुणे | युनिव्हर्सल पब्लिक स्कुल ससाणेनगर , हडपसर, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा ( सी.बी.एस.ई.) स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर | प्राथमिक इ.1ली ते इ.5 वी | 2019-20 |

## अटी व शर्ती

1. संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2. शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यात येईल.
3. संदर्भ क्रमांक - 2 अन्वये सन 2019-20 मध्ये नवीन शाळा परवानगी देण्यात येत आहे. परवानगी मिळाल्यापासुन अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरू न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
4. या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतींच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थालांतर करता येणार नाही.
8. शासन निर्णय जा.क्र. शासन निर्णय क्र. एसएफएस-1019 / प्र.क्र.1261/एसएम-2, दिनांक 20/09/2019 तील अटी शर्तीतील मुद्दा क्र. 2 चे पूर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत माहितीसाठी**
1. मा.अवर सचिव,शालेय शिक्षणवक्रीडाविभाग,मंत्रालय,मुंबई-32
2. मा.शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य),शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-1
3. मा.शिक्षण संचालक (प्राथमिक),शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य,पुणे-1

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/1821/6080/2023 पुणे 1 दिनांक: /11/2023 07/11/2023

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,

डॉ. शिवाजीराव कदम नॉलेज ॲकेडमी, ससाणेनगर, हडपसर, पुणे संचालित
युनिव्हर्सल पब्लिक स्कूल, ( 27251700228 ) ससाणेनगर, हडपसर, पुणे

विषय - सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शासन निर्णय क्र. एसएफएस-1019/प्र.क्र.1261/एसएम-2, दिनांक 20/09/2019 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई

2.जा.क्र.शिउसं/प्राथ-202/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/ 2019-20/225,शिक्षण उपसंचालक पुणे विभाग दिनांक 09/01/2020

3. शाळेकडील प्रथम मान्यता प्रस्ताव दिनांक 14/08/2023

4.श्रीम. मोमीन आस्मा बेगम, उपशिक्षणाधिकारी, जि.प.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल 23/10/2023

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये कळवण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 6 वी ते इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | डॉ. शिवाजीराव कदम नॉलेज ॲकेडमी, ससाणेनगर, हडपसर, पुणे | युनिव्हर्सल पब्लिक स्कूल, ( 27251700228 ) ससाणेनगर, हडपसर, पुणे | इंग्रजी सी.बी.एस.ई. | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 6 वी ते इयत्ता 8 वी | 2021-22 |

## अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस-1019/प्र.क्र.1261/एसएम-2, दिनांक 20/09/2019 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. भविष्यात या शाळेची प्रथम मान्यता बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्‌भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.

(संध्या गायकवाड)
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे